ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 8 | May - 2016

Review Of Research





# नव्वद नंतरच्या दलित कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण

**प्रकाश कांबळे**

मराठी विभाग प्रमुख , के. एन. भिसे आर्टस अॅन्ड सायन्स कॉलेज कुर्डूवाडी,

**प्रस्तावना :-**

१९९० नंतरच्या कालखंडात देशाने स्विकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाने 'जागतिकीकरणाची' प्रक्रिया आपल्या देशात सुरू झाली. काही काळानंतर जेव्हा ही प्रक्रिया स्थिरावली तेव्हा तिचे भयावह परिणाम आपणाला जाणवू लागले. सुरूवातीला निव्वळ व्यापारी आणि आर्थिक असणाऱ्या या प्रक्रियेने सामाजिक जीवनातही नंतरच्या काळात खूप मोठा बदल घडवू आणलेला दिसून येतो. या प्रक्रियेने संपूर्ण सामाजिक व्यवस्थाच ढवळून निघालेली दिसते. आंबेडकरी प्रेरणेचे वलय लाभलेल्या दलित समाजावरही या प्रक्रियेचा खोलवर परिणाम झाला. सामाजिक न्याय व समता ही मूल्ये बाजूला पडून पैसा या एकाच गोष्टीला अपरंपार महत्त्व आले. प्रत्येक क्षेत्रात खाजगीकरणाने डोके वर काढल्याने दलितांच्या हक्कांच्या राखीव जागांची संकल्पनाही मोडीत निघाली. त्यांच्या हाताला काम आणि पोटाला भाकरी मिळणेही दुरापास्त झाले. ग्रामीण आणि शहरी असा दोन्हीकडील दलित समाज यामुळे चांगलाच अडचणीत सापडला. या स्थित्यंतराचे अस्वस्थ करणारे चित्रण नव्वद नंतरच्या दशकातील अरूण काळे, महेंद्र भवरे, उत्तम कांबळे, लोकनाथ यशवंत, धम्मपाल रत्नाकर, रोहन नागदिवे, अविनाश गायकवाड आदि कवींच्या कवितांतून येताना दिसते. प्रस्तुत शोधनिबंधातून नव्वद नंतरच्या दलित कवितेतील जागतिकीकरणाचे चित्रण यावर भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

## १) जागतिकीकरणाच्या आगमानाचे चित्रण :-

राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर घडणा-या सर्वघटनांचे सूचक भान जोपसणारी पिढी म्हणून समकालीन दलित पिढीकडे पाहता येते. भोवतालच्या जगण्यात तीव्र सामाजिक भान असणारी ही पिढी जागतिकीकरणाच्या परिणामाने जीवनानुभववार होऊ घातलेल्या परिणामांची, त्यांच्या सामाजिक जीवनातील अवन तीचे गंभीर आणि सूक्ष्म चित्रण करताना आढळतो. ते अरूण काळे त्यांच्या 'नंतर आलेले लोक' या कवितासंग्रहात लिहीतात,

खुष्कीच्या मार्गातून ।
मसाल्याचा ठसका आला पुन्हा इंडियाची डिस्कव्हरी सुरू झाली ।
सायराबाद अन्. हैदराबाद सुपरमार्केट अन् पानठेला ।
स्पेस शटल अन् सायकलरिक्षा हेलपाट्या अन् कंटेनर्स-----

(नंतर आलेले लोक, पृष्ठ,३०)

सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा समृध्द वारसा लाभलेल्या या भारत देशाच्या वेगळेपणाची ओळख पुसून टाकणाऱ्या जागतिकीकरणाच्या आगमनाचे गंभीर सूतोवा अरूण काळे 'नंतर आलेले लोक' मधून करतात. त्याचबरोबर या व्यवस्थेच्या आगमनाने होणाऱ्या पारंपरिक व्यवस्थेच्या
पडझडीकडेही आपले लक्ष वेधतात.

लोकनाथ यशवंत सारखा संवेदनशील कवी जागतिकीकरणाच्या आगमनाने इथल्या व्यवस्थेचा जाऊ पाहणारा प्राण पाहून उद्विगन होतो आणि लिहितो,

" जग एक कुटुंबचा नारा देऊन
युद्धखोर अमेरिका घुसलीच ना आपल्या घरात
परसाकडच्या टमरेलपासून झोपायच्या उशीपर्यंत
झाली आपल्यावर हावी..."

(पुन्हा चाल करू या, पृष्ठ, १०३)

जागतिकीकरणाने संपूर्ण मानवी जीवनालाच कवेत घेतले आपल्या भोवतालाला वेढून असणाऱ्या प्रत्येक घटकावर जागतिकीकरणाने आपली छाप उमटवलेली दिसते. जग एखाद्या कुटुंबाप्रमाणे जवळ आले, परंतु माणसे माणसांपासून मनाने दूर जाऊ लागल्याचे दु:ख प्रस्तुत कवितेतून आपणासमोर व्यक्त करतात.

### २) दलितांवर झालेल्या परिणामांचे चित्रण :-

जागतिकीरणाने माणूस आणि यंत्रे यांतील स्पर्धा तीव्र केली. अवघ्या सामाजिक व्यवस्थेचे यांत्रिकीकरणात झालेल्या रूपांतरणाने मानवी हात बेकार झाले. सामान्य कामगार, कारागीर, कलाकार यांच्यावर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून उदयास आलेल्या यांत्रिकीकरणाने मोठा घालाच घातला. दोन वेळच्या जेवणाची भ्रांतही त्यांना सुटेना. नव्वद नंतरच्या दलित कवितेत या समस्येचे अत्यंत खोल वरचे चित्रण आलेले आपणास दिसून येते. अरूण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या कविता संग्रहातील 'सीताराम' मास्तरचे अगतिकीकरण या कवितेतून अत्यंत  अस्वस्थ करणारे चित्रण आले आहे. ते लिहीतात,

पोटाला जाळून दोन पोरांना शिकवलं
भविष्याच्या भीतीने ते अस्वस्थ झालेत
लग्नाचा फुल सिझन गेला
फक्त दोन सुपाऱ्या मिळाल्या
कुत्र्या - मांजरासारख्या हाडफिरवाल्या
बेन्जो - बाज्यापुढं आपलं काय चालंना
म्हणे स्पर्धेचं युग आहे.
याला म्हणता काय रे खुली स्पर्धा
काय असतं रे तुझं ते जागतिकीकरणे - खाजगीकरण?

(नंतर आलेले लोक, पृष्ठ, ४८)

सीताराम मास्तर या पारंपरिक सनईवादकाची अगतिकता अरूण काळे प्रस्तुत कवितेतून आपणासमोर मांडतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत डॉल्बीच्या आगमनाने सनईवादनाकडे लोकांचे आपसूकच दुर्लक्ष झाले. त्यामुळे त्याला भणंग, असहाय्य आयुष्याला सामोरे जावे लागेल. प्रेमनाथ रामदासी सीताराम मास्तरच्या या अगतिकीकरणावर भाष्य करताना लिहितात, "बेकारी ही यांत्रिकीकरणाची अपरिहार्य निष्पत्ती आहे. नवनवीन तंत्रज्ञानाच्या निर्मितीमुळे आजचे उद्या कालबाह्य ठरते आहे. उदाहरण द्यायचे झाले तर, डॉल्बी संगीतामुळे विवाहाच्या मंगल प्रसंगाच्यावेळी वाजवली जाणारी सनई सारखी पारंपरिक वाद्ये मागे पडली. त्यामुळे सीताराम मास्तरांसारखे अनेक कसलेले सनईवादक बेकार झाले."[१] जागतिकीकरणाने माणसाला असहाय्य तर बनविलेच परंतु त्यांच्या स्वावलंबी आणि आत्माभिमानाने जगण्याच्या स्वप्नालाही नख लावलेले दिसते.

### ३) बदलत्या सामाजिक जाणिवांचे चित्रण :-

व्यक्तिला समाजातील इतर व्यक्तिंविषयी वाटणारी सहानुभावाची, चांगूलपणाची भावना म्हणजे सामाजिक जाणीव होय. सामाजिक जाणीव या संकल्पनेत मानवी मूल्यांची जोपासना अध्याहृत असते. सामाजिक जाणीवा असणे हे संवेदनशील माणसाचे आणि समाजाचे लक्षण आहे. दुर्दैवाने नव्वद नंतरच्या दशकात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने माणसाचे यंत्रामध्ये रूपांतरान घडवून आणले. त्याच्यातील मानवी भाव-

भावनांचा वेगाने ऱ्हास होऊ लागला. नव्वद नंतरची दलित कविता या हरवत चाललेल्या सामाजिक जाणिवांचे खोलवरचे चित्रण करते. माणसा-माणसा मधील वाढत चाललेल्या अंतरावर भाष्य करताना उत्तम कांबळे आपल्या 'जागतिकीकरणात माझी कविता' या संग्रहात लिहितात,

कोण्या एके काळी।
मैलाच्या दगडावरून ।
कळायचे अंतर आता माणसामाणसातलं।
गावा-गावतलं।
झाडा-झुडपातल  अंतरच वाढत असेल तर।
वेध कसा घ्यावा।
मैलाच्या दगडांनी?

( जागतिकीकरणात माझी कविता, पृष्ठ, ५७)

माणूस माणसापासून जागातिकीकरणाच्या प्रभावाने दुरावत गेल्याचे अपरंपार दुःख उत्तम कांबळेची कविता व्यक्त करते. यंत्रे माणसांची जागा घेऊ लागली आहेत. माणसा-माणसांतील या बदलत्या नात्यांचा वेध घेताना यशवंत मनोहर लिहितात, "आता तर ग्लोबल व्हिलेजमध्ये सारे संदर्भच बदलत आहेत. गावे संगणकाच्या कीबोर्डवरील बटणांसारखी होत आहेत. मैलाचे दगड होत आहेत. संगणकाच्या पोटातील व्हायरस होत आहेत. हे कसे सहन करायचे ? या यंत्राच्या जगात आपले काळजाचे ठोके कसे मोजायचे"[२] माणूस संवेदनाहीन होत चालल्याचा हा काळ अत्यंत भयावह असल्याची जाणीव यशवंत मनोहर याठिकाणी व्यक्त करतात. मानवी जीवन बदलांची अमानवीयतेकडे सुरू असणारी वाटचाल आपणास संभ्रमित करून जाते.

एकूणच नव्वद नंतरच्या दशकातील दलित कवितेतील जागतिकीकरणाच्या चित्रणाचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष आपणाला सुत्ररूपाने पुढील प्रमाणे मांडता येतील.

१) जागतिकीकरणाच्या आगमनाचे संकेत आणि त्यामुळे सामाजिक जीवनात पारंपरिक जीवनव्यवस्थेच्या सुरू असणाऱ्या पडझडीचे चित्रण जवळजवळ सर्वच नव्वद नंतरच्या दशकातील कवींच्या कवितेत येताना दिसते. नव्वद नंतरची दलित कविता जागतिकीकरणाच्या परिणामांविषयी पुरेशी गंभीर असल्याचे दिसते.

२) जागतिकीकरणाने हरवत चाललेल्या सामाजिक जाणिवांचा शोध प्रस्तुत कालखंडातील दलित कवितेतून घेतला जात असलेला दिसून येतो.

३) जागतिकीकरणातून संपूर्ण जग सीमाविरहीत होताना मात्र दुसरीकडे जातीयतेच्या संकल्पनाही तीव्र होताना दिसतात. प्रत्येक जाती स्वतःचा मूलतत्त्ववाद जोपासताना दिसतात.

४) जागतिकीकरणाला सामोरे जाताना सामान्य दलितांची झालेली संभ्रमित अवस्था प्रस्तुत कालखंडातील कवी परिणामकारकपणे. आविष्कृत करतात.

## संदर्भ :-

१) रामदासी प्रेमनाथ नंतर आलेले लोक मधील कविता, नवाक्षर दर्शन,(संपा) प्रवीण बांदेकर एप्रिल ते सप्टें. २००८, पृष्ठ, ५८.

२) मनोहर, यशवंत, जागतिकीकरणात माझी कविता, कवी उत्तम कांबळे, सुगावा प्रका., पुणे, प.आ., २००६, पृष्ठ, १५